सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २४३ | मंगळवार, दि. २६ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
आजचे भाव
२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १५२७००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १४२७००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११७७००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २६७०/-
भाव प्रती १० ग्राम





श्री. सतीश मच्छिंद्र लांडगे
शिक्षक, अमळनेर


श्री. दत्ता कासार
अमळनेर


श्री. दत्ता ठाकरे
अमळनेर


डॉ. उदय अहिरराव
अमळनेर


श्री. हर्ष भंडारी
अमळनेर


श्री. पराग चौधरी
अमळनेर


श्री. विकी वाधवाणी
अमळनेर


श्री. भालचंद्र सनेर
अमळनेर





अमळनेर : निम्न तापी प्रकल्पाच्या कामांची सोमवार, दि. २४ मे रोजी पाहणी करताना आमदार अनिलदादा पाटील. शेजारी नगराध्यक्ष डॉ. बाविस्कर, पालिकेचे मुख्याधिकारी शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजितदादा पवार गट) तालुकाध्यक्ष भागवत पाटील, शहराध्यक्ष चेतन राजपूत, सौ. सुषमाताई देसले, सौ. रिताताई बाविस्कर आदींसह मृद व जलसंपदा विभागाचे उपविभागीय अभियंता पाटील, भटूरकर, उपविभागीय अधिकारी ठाकूर, मोहोळ. दुसऱ्या छायाचित्रात प्रगतिपथावरील काम.

# निम्न तापी प्रकल्पावर १४६१ कोटी खर्च; २४ खांबांचे ६० टक्के काम पूर्ण

## उपसा सिंचन योजना ४२ टक्के मार्गी; कामाची गती समाधानकारक; आमदार अनिलदादा पाटील यांच्याकडून पाहणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यासाठी वरदान ठरणाऱ्या निम्न तापी प्रकल्पावर आतापर्यंत १४६१ कोटी रुपये खर्च झाले असून, २४ खांबांचे काम ६०, तर उपसा सिंचन योजनेचे काम ४२ टक्के पूर्ण झाले आहे. या धरणात सुमारे १८ मीटर पाणीसाठा राहील, अशी माहिती उपस्थित संबंधित अधिकाऱ्यांनी आमदार अनिलदादा पाटील यांना पाहणी दौऱ्याप्रसंगी दिली.

आमदार पाटील यांनी रविवार, दि. २४ मे रोजी सकाळी साडेसात वाजता निम्न तापी प्रकल्पाला व उपसा सिंचन योजनांना भेट देऊन कार्यकारी अभियंता यशोदीप कडलग व इतर अधिकाऱ्यांकडून कामाचा आढावा घेतला. डाव्या बाजूच्या माती धरणाचे ९० टक्के काम पूर्ण झाले असून, उर्वरित काम प्रगतिपथावर आहे. उजव्या बाजूच्या माती धरणाचे काम शंभर टक्के पूर्ण झाले आहे. प्रकल्पाचा सांडवा, विभाजक भिंत, मार्गदर्शक भिंत आदींचे कामही शंभर टक्के पूर्ण झाले आहे.

**निधीची स्थिती**

प्रकल्प पूर्णतेसाठी आणखी ३४२९.७६ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. टप्पा १ साठी १६५०.२० कोटी रुपये लागणार आहेत. केंद्र शासनाकडून २७.२५ कोटी रुपये प्राप्त झाले असून, राज्य शासनाने यावर्षी ५९.९९ कोटींची तरतूद केली आहे.

**उपसा सिंचन योजनांची प्रगती**

भौगोलिक परिस्थितीमुळे कालव्याऐवजी उपसा सिंचन योजनांद्वारे शेतापर्यंत पाईपलाईन टाकून पाणी शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचविले जाणार आहे. या कामाची देखील आमदार पाटील यांनी प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेतला तसेच कामाला गती देण्याच्या सूचना केल्या. बोहरा येथील उपसा सिंचन योजना क्र. १ व २ च्या पंप हाऊसचे खोदकाम पूर्ण झाले आहे. कलाली येथील योजना क्र. ३ व ४ च्या पंप हाऊसचे खोदकामही पूर्ण झाले आहे.

या योजनेंतर्गत २५,६५७ हेक्टर क्षेत्र सिंचनासाठी पाईपलाईन टाकली जात आहे. ७४ किलोमीटरच्या मुख्य पाईपलाईनपैकी ४६ किलोमीटरपर्यंत पाईप टाकून झाले आहेत. वितरण प्रणालीसाठी ४९१ पैकी २०८ किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहे.

खेडी बुद्रुक येथील उपसा सिंचन योजना १ च्या पंप हाऊससाठी जमीन संपादन प्रक्रिया सुरू आहे. साने गुरुजी उपसा सिंचन योजना बोहरा आणि कपिलेश्वर उपसा सिंचन योजनेतून ९,४९८ हेक्टर, योजना क्र. २ मधून ३,७६५ हेक्टर, कलाली योजना क्र. ३ मधून ३,९१२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. योजना क्र. ४ मधून अमळनेर, धरणगाव व पारोळा तालुक्यातील ५,९२१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. चोपडा तालुक्यातील धुपे येथील पाचव्या योजनेतून २,५६१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार असून, पंपगृहासाठी जमीन संपादन सुरू आहे.

### प्रकल्प पूर्णतेसाठी आणखी तीन वर्षे लागणार

प्रकल्प पूर्ण होण्यासाठी आणखी तीन वर्षांचा कालावधी लागेल. खांब, वक्राकार द्वार व उपसा सिंचन योजनांचा टप्पा १ पूर्ण करण्यासाठी दरवर्षी सरासरी पाचशे कोटींचा निधी मिळाल्यास तीन वर्षांत काम पूर्ण होईल. त्यामुळे टप्पा १ मध्ये एकूण ३२,३२८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. यावेळी नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजितदादा पवार गट) तालुकाध्यक्ष भागवत पाटील, शहराध्यक्ष चेतन राजपूत, विक्रांत पाटील, महेंद्र बोरसे, संजय पुनाजी पाटील, एल. टी. पाटील, सौ. सुषमाताई देसले, सौ. रिताताई बाविस्कर, जितेंद्र ठाकूर, मुख्तार खाटीक, संभाजी पाटील, राजू फापोरेकर, दीपक बागूल, मृद व जलसंपदा विभागाचे उपविभागीय अभियंता डी. सी. पाटील, हितेश भटूरकर, उपविभागीय अधिकारी वेणीमहादेव ठाकूर, जितेंद्र मोहोळ, पालिकेचे मुख्याधिकारी गणेश शिंदे, प्रा. सुरेश पाटील, नगरसेवक देवेंद्र कांबळे, भरत ललवाणी, ॲड. यज्ञेश्वर पाटील, भूषण भदाणे, रणजीत पाटील, अनिल शिसोदे, सचिन पाटील, रामकृष्ण पाटील, रवींद्र पाटील, विनोद कदम, संदीप जैन, नितीन निळे, उमेश वाल्हे, बाळू पाटील, गुणवंत पाटील, वेद पाटील यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

# खानदेशवासीयांनाही 'नवतपा'ची झळ



## अमळनेरचे तापमान ४२ अंशांवर; उष्ण वाऱ्यांमुळे जनजीवन विस्कळीत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या १५ दिवसांपासून खानदेशातील अनेक भागांमध्ये तापमानाचा पारा प्रचंड वाढलेला आहे. त्यात आजपासून (दि. २५ मे २०२६) 'नवतपा' सुरू झाला आहे. त्यामुळे हा काळ म्हणजे सलग ९ दिवस उन्हाळ्यातील सर्वांत उष्णतेचा असणार आहे. या काळात सूर्याचा तडाखा अधिक तीव्र होत असून, उष्ण वाऱ्यांमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. 'नवतपा'चा कालावधी २५ मे ते २ जून २०२६ पर्यंत राहणार आहे. त्यात आज येथील तापमानाचा पार ४२ अंशांवर पोहोचून उष्ण वाऱ्यांमुळे शहरातील जनजीवन विस्कळीत झाल्याचे पाहावयास मिळाले.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार 'नवतपा'च्या कालावधीत उत्तर महाराष्ट्रासह खानदेशातील जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये तापमानाचा पारा ४४ ते ४७ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी उष्णतेच्या लाटांचा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे 'नवतपा'च्या काळात उष्णतेची तीव्रता आणखी वाढणार असल्याचे संकेत आहेत.

**'नवतपा' का पडतो?**

हिंदू पंचांगानुसार सूर्य रोहिणी नक्षत्रात प्रवेश करतो, त्या काळाला 'नवतपा' म्हणतात. या काळात तापमान ४५ ते ५२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचू शकते. वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहता, सूर्य कर्क रेषेजवळ येतो आणि सूर्यकिरणे थेट पृथ्वीवर पडतात. त्यामुळे उष्णतेत मोठी वाढ होते. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आणि जूनच्या सुरूवातीला हा कालावधी अनुभवायला मिळतो. या दिवसांत दुपारी प्रचंड उकाडा, गरम वारे आणि अंगाची लाही-लाही करणारे ऊन यामुळे नागरिक त्रस्त होतात.

**'नवतपा'चा शरीरावर काय परिणाम?**

वाढत्या उष्णतेमुळे उष्माघात, अशक्तपणा, चक्कर येणे आणि निर्जलीकरणाचा धोका वाढतो. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्याने थकवा, डोकेदुखी आणि बेचैनी जाणवते. विशेषतः शेतकरी, मजूर, लहान मुले आणि वृद्ध नागरिकांना याचा अधिक त्रास होतो.

**'नवतपा'पासून बचाव कसा कराल?**

नवतपाच्या काळात दुपारच्या कडक उन्हात

पान २ वर

### खानदेश ४५ अंशांच्या उंबरठ्यावर

खानदेशातील जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून तापमान सातत्याने वाढत आहे. अनेक ठिकाणी तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअस दरम्यान नोंदविले जात आहे. दुपारच्या वेळेत रस्ते ओस पडलेले दिसत असून नागरिक घराबाहेर पडणे टाळत आहेत. शेतकरी आणि बांधकाम कामगारांना उष्णतेचा मोठा फटका बसत असून कामाचे तास बदलावे लागत आहेत. बाजारपेठांमध्येही दुपारच्या वेळेत गर्दी कमी झाल्याचे चित्र आहे.




शुभेच्छुक

मुंदडा फाउंडेशन संचलित

श्री एन टी मुंदडा ग्लोबल व्ह्यू स्कूल
श्री एन टी मुंदडा विद्या मंदिर
श्री एन टी मुंदडा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय
स्वर्गीय सौ पद्मावती नारायणदास मुंदडा माध्यमिक विद्यालय
श्री मधुसूदन सुरजमल मुंदडा माध्यमिक विद्यालय
स्व. पं. श्रीमती इंदिरा गांधी विद्यामंदिर

सर्व संचालक मंडळ, सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद.

ओमप्रकाश मुंदडा, नरेंद्र मुंदडा, योगेश मुंदडा, राकेश मुंदडा, पंकज मुंदडा, अभिनय मुंदडा, अमेय मुंदडा, शुभम मुंदडा, चिराग मुंदडा, गौतम मुंदडा, वरद मुंदडा

MUNDADA BUILDERS AND DEVELOPERS
INNOVATION|TRUST|QUALITY ~SINCE 1989~

MUNDADA BUILDERS AND DEVELOPERS
Office- Shri N. T. Mundada Park, Amalner Dist. Jalgaon
Amey Mundada- 8600505545 | Shubham Mundada- 8806092929

# संपादकीय

## साठा असताना तुटवडा का दिसतो?


ज्या पद्धतीने युद्धजन्य परिस्थितीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न होतो आहे तो पुरेसा नाही, हे स्पष्ट होते. इराण आणि अमेरिकेतला संघर्ष ज्यावेळी शिगेला पोहोचला होता त्यावेळी देशभरात इंधन टंचाईची जोरदार अफवा पसरली. पेट्रोल-डिझेल खरेदी करण्यासाठी पेट्रोल पंपांवर लागलेल्या रांगांपासून ते गॅस सिलिंडर खरेदीसाठी उडालेली धांदल कल्पनेपलिकडची होती. कारण प्रत्यक्षात परिस्थिती तशी नसताना टंचाई होईल या भीतीने लोकांनी इंधन खरेदीसाठी गर्दी केली होती. आता युद्ध संपवून जवळपास महिना होत आला. ज्या होर्मुज सामुद्रधुनीतून इंधन आणणारी जहाजं सुखरूपपणे भारतात पोहोचू लागली आहेत. आणि येणाऱ्या परिस्थितीचा विचार करून पुरेसा साठा शिल्लक ठेवण्याचा प्रयत्न होतो आहे. संपूर्ण देशात इंधनाची योग्य प्रमाणात पूर्तता केली जाते आहे. तरीदेखील पुन्हा एकदा इंधन टंचाईच्या भीतीने जिकडे तिकडे रांगा लागलेल्या दिसतात. विशेषतः महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून पुन्हा एकदा या इंधनटंचाईचे विचित्र चित्र निर्माण झालेले दिसते आहे. पेट्रोल पंपांवर वाहनांच्या रांगा तर आहेतच. परंतु शेतकरीसुद्धा ट्रॅक्टरसाठी लागणाऱ्या डिझेलकरीता रांगा लावताना दिसत आहेत. सुदैवाने गॅस सिलिंडरबाबत परिस्थिती फारशी हाताबाहेर गेलेली दिसत नाही. राज्यातल्या एखाददुसऱ्या जिल्ह्यात पेट्रोल पंपांवरच्या रांगा लागलेल्या समजू शकतात. परंतु महाराष्ट्रातल्या जवळपास प्रत्येक जिल्ह्यात पेट्रोल पंपांवर पेट्रोल-डिझेल संपल्याच्या पाट्या पाहायला मिळतात. अशा परिस्थितीत सरकारकडून राज्यात कोणत्याही प्रकारची इंधनटंचाई नाही हे वारंवार सांगितले जात आहे. इंधनाचा पुरेसा साठा आहे. लोकांनी घाबरून साठा करण्याची आवश्यकता नाही. अशा प्रकारांमुळे इंधनाची पुरवठा साखळी विस्कळीत होते. सरकारी पातळीवर हा खुलासा जरी योग्य ठरत असला तरीसुद्धा अशा प्रकारची टंचाई निर्माण होण्याचे कारण काय यामागची नेमकी परिस्थिती समोर येणे गरजेचे आहे. ज्याअर्थी विशिष्ट मुदतीआधीच पेट्रोल पंपांवरचा इंधन साठा संपत असेल तर मागणीमध्ये अनावश्यक वाढ झाली असली पाहिजे किंवा पेट्रोल पंप चालकांनी ही कृत्रिम टंचाई निर्माण केली असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

केंद्र आणि राज्य सरकारकडून वारंवार साठा भरपूर असल्याचे सांगितले जाते आहे. तरीसुद्धा एकाच नाही तर अनेक ठिकाणी पेट्रोल पंपांवर पेट्रोल-डिझेल कसे काय संपते. जरी नागरीक भीतीने साठा करून ठेवत असले तरीसुद्धा पुरवठा ज्या वेळापत्रकाप्रमाणे कायम राहिला पाहिजे. याचा अर्थ पूर्वी सप्लाय चेन म्हणजेच पुरवठा साखळीतून जे वेळापत्रक होते तेसुद्धा कुठेतरी विस्कळीत झालेले दिसते. यामध्ये दोन महत्त्वाच्या शक्यता गांभीर्याने लक्षात घेतल्या पाहिजेत. एक म्हणजे या टंचाईसदृश्य परिस्थितीचा गैरफायदा घेऊन जाणीवपूर्वक कृत्रिम टंचाई निर्माण करीत असली पाहिजे. आणि दुसरी शक्यता म्हणजे काही प्रमाणात इंधन टंचाई निर्माण झालेली आहेच. परंतु बदललेल्या पुरवठा साखळीच्या वेळापत्रकाचे नियोजन झालेले दिसत नाही. पहिल्या शक्यतेप्रमाणे अगदी पेट्रोल पंप मालकांकडूनसुद्धा ही कृत्रिम टंचाई निर्माण केली जात असण्याची शक्यता आहे. अनेक ठिकाणी मोठमोठ्या कॅन्स घेऊन अनेक लोक इंधन साठा करताना दिसतात. त्यातले कितीजण खरोखरच वाहन चालक किंवा ट्रॅक्टर चालक आहेत. किंवा जाणीवपूर्वक अशा प्रकारचा साठा करून तो दामदुप्पट किमतीने विकण्याचा प्रकारही होत असला पाहिजे. दुसऱ्या शक्यतेप्रमाणे सरकारने साठा भरपूर आहे अशी नुसती दवंडी पिटवून चालणार नाही. एकीकडे मुख्यमंत्री साठा भरपूर असल्याचे सांगतात तर दुसरीकडे राज्याचे पुरवठा मंत्री हे एक महिना पुरेल एवढाच साठा असल्याचे सांगतात. सरकारमधलाच हा विरोधाभास कृत्रिम टंचाईला आमंत्रण देणारा ठरतो. पुरवठा भलेही भरपूर असेल. परंतु युद्धानंतर परिस्थिती बदललेली आहे. आणि नकळतपणे प्रत्येक पेट्रोल पंपावर होणाऱ्या पुरवठ्यावर काही ना काही परिणाम झालेला आहे. ही सगळी शक्यता लक्षात घेऊन ही सप्लाय चेन सुरळीत करण्यासाठी सरकारला तितकेच प्रयत्न करावे लागतील. इतक्या वेळा सांगूनही लोकांचा सरकारवर विश्वास बसू नये. म्हणजेच सरकारी यंत्रणांनी तसे वातावरण निर्माण केलेले नाही.

विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदींनी गेल्या आठवड्यात काटकसरीच्या अनेक सूचना केल्या. त्यामध्ये इंधन काळजीपूर्वक वापरण्याचा सल्ला दिला आहे. त्यांच्या या सूचनांवर देशभरातल्या सगळ्याच अर्थतज्ज्ञ आणि राजकीय पंडितांनी आपापले सूर लावले. आणि देशाची आर्थिक स्थिती भयावह असल्याचे अंदाज वर्तवले आहेत. सामान्य माणसाला त्याच्या दैनंदिन जीवनातल्या गरजांची जास्त चिंता असते. कारण याच इंधनाचा त्याच्या रोजीरोटीवर परिणाम होत असतो. आज लाखो दुचाकी वाहन चालक बस, रेल्वे टॅक्सीचा प्रवास परवडत नाही म्हणून स्वतःच्या वाहनाने कामावर पोहोचत असतात. जर इंधन मिळाले नाही तर त्याची अचानक फजिती होण्याची शक्यता असते. तीच समस्या छोटे मोठे व्यवसाय करणाऱ्यांची असते. पेट्रोल पंपांवर ज्या रांगा दिसत आहेत, त्यात प्रामुख्याने दुचाकी वाहन चालकांची गर्दी असते. एकीकडे महागाईचा दणका तर दुसरीकडे अशा प्रकारच्या कृत्रिम टंचाईचा फटका बसत असल्याने लोकांच्या मनात भीती निर्माण होणे स्वाभाविक ठरते. या सर्व परिस्थितीत राज्य सरकारने लोकांमध्ये विश्वास निर्माण होईल असे वातावरण निर्माण करावे आणि मंत्री असतील, सरकारी अधिकारी असतील या सर्वांमध्ये समन्वय राहील. परस्परविरोधी विधाने होणार नाहीत. ज्यातून सामान्य माणसाची तारांबळ उडणार नाही. आज जरी सरकारच्यावतीने साठा भरपूर असल्याची ग्वाही दिली जात असली तरी भविष्यकाळामध्ये काही ना काही परिणाम इंधन पुरवठ्यावर होणार आहे.

# जन्मदिन विशेष

# जनतेच्या मनातील लोकनेता



लोबल महातेज वृत्तसेवा

महाराष्ट्राच्या राजकारणात साधेपणा, विकासदृष्टी आणि सर्वसामान्यांशी असलेली जवळीक यामुळे वेगळी ओळख निर्माण करणारे नाव म्हणजे विलासराव देशमुख. ग्रामीण मातीतून पुढे येत राज्याच्या मुख्यमंत्रीपदापर्यंतचा त्यांचा प्रवास हा अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला. त्यांचा मंगळवार, दि. २६ मे रोजी जन्मदिन. त्यानिमित्त त्यांच्या कार्याचा, नेतृत्वशैलीचा आणि महाराष्ट्राच्या विकासासाठी दिलेल्या योगदानाचा घेतलेला आढावा.

**ग्रामीण भागातून राज्यकारभारापर्यंत**

२६ मे १९४५ रोजी लातूर जिल्ह्यातील बाबळगाव येथे विलासराव देशमुख यांचा जन्म झाला. ग्रामीण जीवनातील संघर्ष त्यांनी जवळून अनुभवला होता. त्यामुळेच सामान्य माणसाच्या अडचणींची त्यांना खरी जाणीव होती. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी वकिली व्यवसाय केला; मात्र समाजकारणाची ओढ त्यांना राजकारणात घेऊन आली. स्थानिक स्वराज्य संस्थांमधून त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात केली. ग्रामपंचायत ते जिल्हा परिषद आणि नंतर राज्याच्या राजकारणात त्यांनी सातत्याने आपले वेगळेपण सिद्ध केले.

**महाराष्ट्राचे विकासाभिमुख मुख्यमंत्री**

विलासराव देशमुख यांनी दोन वेळा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळली. त्यांच्या नेतृत्वकाळात प्रशासनात समन्वय, विकासकामांमध्ये गती आणि गुंतवणुकीसाठी सकारात्मक वातावरण निर्माण झाले.

**पायाभूत सुविधांवर भर**

त्यांच्या कार्यकाळात रस्ते, शहरी विकास, माहिती तंत्रज्ञान आणि औद्योगिक गुंतवणूक यांना विशेष चालना मिळाली. मुंबई आणि पुण्यासारख्या शहरांच्या आधुनिकीकरणासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. राज्यात आयटी उद्योगाला प्रोत्साहन देण्यामध्ये त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते.

**ग्रामीण विकासाची बांधिलकी**

ग्रामीण भागातील पाणी, शेती, रोजगार आणि शिक्षण या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने लक्ष केंद्रित केले. "गावाचा विकास म्हणजे राज्याचा विकास" हा त्यांचा दृष्टिकोन होता. लातूरसह मराठवाड्यातील विकासकामांसाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

**सहकार आणि शिक्षण क्षेत्राला चालना**

सहकार चळवळ मजबूत करण्याबरोबरच शिक्षणसंस्था उभारण्यातही त्यांचा मोठा वाटा होता. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी त्यांनी अनेक उपक्रमांना प्रोत्साहन दिले.

**लोकांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते**

विलासराव देशमुख यांची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांचा माणुसकीपूर्ण स्वभाव. विरोधकांशीही सौहार्दाने संवाद साधणारे नेते म्हणून त्यांची ओळख होती. राजकीय मतभेद असले तरी वैयक्तिक संबंध जपण्याची त्यांची शैली अनेकांना भावायची. त्यांच्या भाषणात विनोदबुद्धी, सहजता आणि ग्रामीण भाषेचा गोडवा असे. त्यामुळे सामान्य कार्यकर्त्यांपासून ते वरिष्ठ नेत्यांपर्यंत सर्वांशी त्यांचे सुसंवादाचे नाते होते.

**राष्ट्रीय राजकारणातील भूमिका**

राज्याच्या राजकारणाबरोबरच केंद्रातही त्यांनी महत्त्वाची जबाबदारी सांभाळली. केंद्रीय मंत्री म्हणून त्यांनी विज्ञान-तंत्रज्ञान, ग्रामविकास आणि उद्योग क्षेत्राशी संबंधित विषयांवर काम केले. दिल्लीतील राजकारणातही महाराष्ट्राचा प्रभावी आवाज म्हणून त्यांना मान मिळाला.

**सांस्कृतिक जाण असलेले नेतृत्व**

विलासराव देशमुख यांना कला, साहित्य आणि चित्रपटसृष्टीबद्दल विशेष जिव्हाळा होता. मराठी संस्कृतीचा अभिमान बाळगणारे नेते म्हणून ते ओळखले जात. कलाकारांशी त्यांचे आत्मीय संबंध होते. विकासाबरोबरच सांस्कृतिक समृद्धीलाही त्यांनी तितकेच महत्त्व दिले.

**आजही स्मरणात राहणारे नेतृत्व**

१४ ऑगस्ट २०१२ रोजी त्यांचे निधन झाले. मात्र, त्यांच्या कार्याची छाप आजही महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनावर कायम आहे. शांत, संयमी आणि विकासाभिमुख नेतृत्व कसे असावे याचे उदाहरण म्हणून त्यांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांना अभिवादन करताना महाराष्ट्राच्या विकासासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची आठवण प्रत्येकाला प्रेरणा देणारी ठरते. जनतेशी नाळ जपणारा नेता, प्रशासन कुशलतेने हाताळणारा मुख्यमंत्री आणि माणुसकी जपणारा राजकारणी म्हणून विलासराव देशमुख हे महाराष्ट्राच्या इतिहासात कायम स्मरणात राहतील.

## 'लायन्स'च्या मोफत हाडे-सांधे तपासणी शिबिरास प्रतिसाद

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : लायन्स क्लब ऑफ अमळनेरतर्फे रविवार, दि. २४ मे रोजी प्राजक्ता क्लिनिकमध्ये मोफत हाडे-सांधे तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. त्यास नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिराप्रसंगी डॉ. संदीप सुरेश पाटील यांनी १०५ रुग्णांची तपासणी करून सांधे प्रत्यारोपण, कंबरदुखी व आधुनिक शस्त्रक्रियांबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. संदीप जोशी, सचिव महेंद्र पाटील, कोशाध्यक्ष नितीन विंचूरकर, प्रोजेक्ट चेअरमन शेखर धनगर, डॉ. धीरज कोकाटे, राजेश कुंदनानी, डॉ. मिलिंद नवसारीकर, रवींद्र कालरा, प्रशांत सिंघवी, रवींद्र जैन, नीरज अग्रवाल, प्रदीप जैन, प्रदीप अग्रवाल, सुनील चौधरी, एस. डी. भरुचा, डॉ. किशोर शहा, योगेश मुंदडा, डॉ. रवींद्र कुलकर्णी, श्याम गोकलानी, राजेश वरलानी, प्रा. नयना नवसारीकर आदी उपस्थित होते.

तालुक्यासह परिसरातील नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला.



*अमळनेर : अहिर सुवर्णकार समाजाचे माजी अध्यक्ष जितेंद्र भामरे यांचा वाढदिवसानिमित्त गुलाबपुष्प देत यथोचित सन्मान करीत शुभेच्छा देताना दै. ग्लोबल महातेजचे कार्यकारी संपादक भरत पाटील व ब्युरो चीफ रजनीकांत पाटील.*

## खानदेशवासीयांना 'नवतपा'ची झळ

पान १ वरून

बाहेर पडणे टाळावे. बाहेर जाताना डोक्यावर टोपी, गमछा किंवा छत्रीचा वापर करावा. शरीरात पाण्याची कमतरता होऊ नये म्हणून भरपूर पाणी, ताक, लिंबूपाणी, सरबत यांसारख्या द्रव पदार्थांचे सेवन करावे. हलका व पचायला सोपा आहार घ्यावा. शक्यतो दुपारी 12 ते 4 या वेळेत बाहेरची कामे टाळावीत.

'नवतपा' संपल्यानंतर दिलासा?

'नवतपा' संपल्यानंतर हवामानात बदल होण्यास सुरूवात होते. या ९ दिवसांनंतर मोसमी पावसासाठी पोषक वातावरण तयार होते. त्यानंतर उष्णतेपासून काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता असते.



*अमळनेर : रिवा (उत्तर प्रदेश) येथील दोन जैन आर्यिका माताजींचा (साध्वी) संशयास्पद मृत्यू झाला. या प्रकरणी सोमवार, दि. २५ मे रोजी तीव्र संताप व्यक्त करीत तहसीलदार सुराणा यांना निवेदन देताना जैन समाजबांधव.*

# रिवातील जैन साध्वींच्या मृत्यू प्रकरणी अमळनेरमधील जैन समाज आक्रमक

### दोषींना अटक करून कठोर कारवाईची मागणी; तहसीलदारांना निवेदन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : रिवा (उत्तर प्रदेश) येथील दोन जैन आर्यिका माताजींच्या (साध्वी) संशयास्पद मृत्यू प्रकरणी येथील समस्त जैन समाजातर्फे तीव्र संताप व्यक्त करत कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. या घटनेच्या निषेधार्थ जैन समाजबांधवांनी मुख्यमंत्री व गृहमंत्र्यांना उद्देशून तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांच्यामार्फत निवेदन देत दोषींना तातडीने अटक करून त्यांना कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे.

दि. २० मे २०२६ रोजी सकाळच्या सुमारास रिवा जिल्ह्यात पायी विहार करताना १०५ आर्यिका श्रुतमणी माताजी व १०५ आर्यिका उपशममाताजी यांना भरधाव चारचाकी वाहनाने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात एका साध्वीजींचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर दुसऱ्या साध्वीजींचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे देशभरातील जैन समाजात हळहळ आणि संतापाची लाट उसळली आहे.

दरम्यान, या घटनेचे काही व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर हा केवळ अपघात नसून हेतुपुरस्सर घडवून आणलेला प्रकार असू शकतो, असा संशय जैन समाजाने व्यक्त केला आहे. यापूर्वीही विविध ठिकाणी साधू-संतांवर झालेल्या घटनांमुळे समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. शासनाने याची गांभीर्याने दखल घ्यावी.

अमळनेरमधील जैन समाजाने या घटनेचा तीव्र निषेध नोंदवत दोषींना तत्काळ अटक करून कठोर शिक्षा द्यावी, तसेच भविष्यात साधू-संतांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी केली आहे. राज्य व केंद्र शासनाने या प्रकरणात संवेदनशीलता दाखवत न्याय मिळवून द्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. या निवेदनावेळी जैन समाजातील विविध संघटनांचे पदाधिकारी, संघपती व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरूम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# २२ की उम्र में आयएएस बन कर रचा इतिहास

## बिना कोचिंग घर पर यू-ट्यूब से तैयारी कर पास की यूपीएससी परीक्षा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी

कहते है की अगर मन में जनून को किसी भी सपने को पूरा करने का तो वह कड़ी मेहनत से पूरा हो ही जाता है। आयएएस, आयपीएस बनने का सपना तो लाखों युवा देखते हैं, लेकिन इसे पूरा कुछ ही लोग कर पाते हैं। कुछ युवा जी-जान लगा देते हैं। कुछ कोचिंग करते हैं, तो कुछ नोट्स ढूंढते रहते हैं, वहीं कुछ ऐसे भी होते हैं जो सेल्फ स्टडी के दम पर यूपीएससी जैसी कठिन परीक्षा क्लियर कर आईएएस और आईपीएस बन जाते हैं।

आज हम बात करने जा रहें है एक ऐसी लड़की की जिसने किसी तरह की कोई कोचिंग नहीं ली और यूट्यूब से यूपीएससी की तैयारी की। आखिरकार, एक दिन उसने परीक्षा पास करके आयएएस अधिकारी बनने का सपना साकार कर लिया।

आयएएस वंदना मीणा की।



वंदना मीणा मूल रूप से राजस्थान के सवाई माधोपुर की रहने वाली हैं। कुछ साल गांव में रहने के बाद उनके माता-पिता दिल्ली आ गए। उनके पिता पृथ्वीराज मीणा दिल्ली पुलिस में कार्यरत थे। ऐसे में वंदना भी दिल्ली आ गईं और उनकी आगे की पढ़ाई-लिखाई भी यहीं से हुई। वंदना ने दिल्ली के सेंट कोलंबस स्कूल से अपनि स्कूली शिक्षा को पूरा किया और बाद में दिल्ली विश्वविधालय से मैथ्स ऑनर्स की डिग्री हासिल की।

वंदना मीणा ने ग्रेजुएशन के बाद यूपीएससी सिविल सर्विसेज की तैयारी शुरू कर दी। उन्होंने किसी कोचिंग में एडमिशन नहीं लिया। उन्होंने घर पर रहकर सेल्फ स्टडी की।

इसके बाद वह इसकी तैयारी में जुट गईं। वंदना ने यह भी बताया कि उन्होंने घर पर रहकर यू-ट्यूब से यूपीएससी परीक्षा से जुड़े टॉपिक्स पढ़े और इसकी तैयारी के लिए ऑनलाइन किताबें मंगवाईं। आखिरकार, वंदना की मेहनत रंग लाई और वह वर्ष २०२१ की यूपीएससी परीक्षा में सफल हो गईं। वंदना ने ३३० वीं रैंक हासिल की और आयएएस के लिए चयनित हो गईं। वंदना ने इसके लिए रोजाना १५ से १६ घंटे पढ़ाई करने का दावा किया था।

सरकारी वेबसाइट जूनागढ के मुताबिक आयएएस वंदना मीणा वर्तमान में गुजरात के जूनागढ़ जिले में तैनात हैं। वह यहाँ के केसोड़ इलाके में बतौर एसडीएम काम कर रही हैं।

# गाण्यात होता चुकीचा शब्द, बदलताच ठरले प्रचंड लोकप्रिय

## मोडले सर्व रेकॉर्ड, आजही प्रत्येकाचे आवडते

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मनोज कुमार यांच्या या गाण्यात होती एक मोठी चूक. पण एक शब्द बदलताच गाणे ठरले प्रचंड लोकप्रिय. ५९ वर्षांपासून प्रत्येकाच्या ओठांवर असते हे गाणे. देशभक्तीपर गाण्यांचा विषय निघाला की आजही सर्वप्रथम आठवण येते ती 'मेरे देश की धरती' या अजरामर गाण्याची. तब्बल ५९ वर्षांपूर्वी रिलीज झालेले हे गाणे आजही प्रत्येक स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन आणि राष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये आवर्जून वाजवले जाते.







हे गाणे 'उपकार' या चित्रपटातील होते. माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या 'जय जवान-जय किसान' या घोषणेपासून प्रेरित होऊन मनोज कुमार यांनी हा चित्रपट तयार करण्याचा निर्णय घेतला होता. देशभक्ती, शेतकरी आणि सैनिकांच्या आयुष्यावर आधारित या चित्रपटाला प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला होता.

चित्रपटासोबतच त्यातील गाणीही प्रचंड गाजली होती. त्यामधील 'मेरे देश की धरती सोना उगले, उगले हीरे मोती' हे गाणे इतिहासात अजरामर ठरले. या गीतामागे एक अतिशय रंजक किस्सा दडलेला आहे. माध्यमांतील रिपोर्ट्सनुसार, गीतकार गुलशन बावरा यांनी हे गाणे लिहिले होते. मात्र सुरूवातीला या गाण्याची पहिली ओळ वेगळी होती. त्यांनी सुरूवातीला 'इस देश की धरती सोना उगले' अशी ओळ लिहिली होती. गाण्याच्या रिहर्सलदरम्यान मात्र कल्याणजी-आनंदजी यांना 'इस' हा शब्द सतत खटकत होता. गाण्याच्या धुनेसोबत तो शब्द योग्य प्रकारे जुळत नव्हता आणि अपेक्षित भावना निर्माण होत नव्हती.

गाण्यावर अनेक बैठका झाल्या, चर्चा झाल्या, पण समाधान मिळत नव्हते. सुरूवातीला गीतकार गुलशन बावरा यांनाही या ओळीत काही त्रुटी वाटत नव्हती. मात्र कल्याणजी-आनंदजी यांना असे वाटत होते की 'इस देश' म्हणताना आपल्या देशाशी असलेली आत्मीयता आणि जवळीक जाणवत नाही. गाण्यात 'माझा देश' अशी भावना अधिक प्रभावीपणे व्यक्त व्हायला हवी होती.

अखेर कल्याणजी-आनंदजी यांच्या मनात अचानक 'मेरे देश' हा शब्द आला आणि त्यांनी 'इस' ऐवजी 'मेरे' हा शब्द वापरण्याचा निर्णय घेतला. हा बदल होताच गाण्याची संपूर्ण भावना बदलली आणि ती ओळ धुनेसोबत अगदी परफेक्ट बसली. गाणे रिलीज झाल्यानंतर मात्र परिस्थिती पूर्णपणे बदलली. हे गाणे देशभरात लोकप्रिय झाले आणि लोकांच्या मनात कायमचे घर करून बसले.

# 'या' आंब्याचा रुबाबच न्यारा, करावी लागते आगाऊ बुकिंग!

## ९ झाडांच्या सुरक्षेसाठी खास ९ गार्डस् तैनात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



फळांचा राजा म्हटला जाणारा आंबा हा सर्वांचा आवडता असतो. महाराष्ट्रात हापूस आंब्याला जसा मान आहे तसाच उत्तर भारतातील या आंब्याला आखाती देशात मागणी प्रचंड आहे. एका फळाची किंमत पाहून तुम्हाला मोठे आश्चर्य वाटेल.

मध्य प्रदेशातील आलीराजपूर जिल्ह्यात एक असा आंबा पिकतो ज्याची सुरक्षा करण्यासाठी खास गार्ड तैनात करण्यात आले आहेत. ९ झाडांच्या सुरक्षेसाठी १० ते ११ सुरक्षा रक्षक तैनात केलेले आहे. याचे कारण या आंब्याची किंमत, विशाल आकार, दुर्मिळता आणि खास स्वाद आहे. कारण देशातच नाही तर विदेशात या आंब्याची चर्चा सुरु असते. याची किंमत १५०० ते ३००० रुपये प्रति फळापर्यंत पोहचते. आणि या खास आंब्यासाठी अगोदरच ॲडव्हान्स बुकींग करावी लागते. या आंब्याचे नाव आहे 'नूरजहाँ'!

मध्य प्रदेशातील आदिवासी बहुल आलीराजपूर जिल्ह्यातील जूना कट्ठीवाडा गावातील शिव आम फार्म मध्ये नूरजहाँ या आंब्याची खास पैदास केली जाते. फार्मचे संचालक किसान भरतराजसिंह जादव सांगतात की नूरजहाँ या आंब्याचे मूळ अफगाणातील आहे. ६० च्या दशकात त्यांचे दिवंगत पिता रणवीरसिंह जादव यांनी गुजरातच्या बनमाह क्षेत्रातून या आंब्याची रोपे आणली होती. आज भरतराजसिंह यांच्या नूरजहा या आंब्याची नऊ मोठी झाडे आहेत. यांचे आयुष्य २० ते २५ वर्षे आहे. त्यांनी ग्राफींग तंत्राने ११ नवीन रोपे देखील तयार केली आहेत.

आजूबाजूच्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या आंब्याची शेती करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांच्या फार्मसारखे मोठे आणि वजनदार फळ मिळाले नाही. त्याचमुळे हा आंबा आलीराजपूरची खास ओळख बनला आहे.

### २ ते ५ किलोचा असतो एक आंबा

नूरजहाँ आंब्यांना जगातील सर्वात मोठा आंबा म्हणून ओळखले जाते. सामान्यपणे एका फळाचे वजन २ ते ५ किलोग्रॅमपर्यंत जाते. याचा आकार इतका विशाल असतो की एक आंबा संपूर्ण कुटुंबाला पुरतो. याचा आकर्षक रंग, सुगंध खूपच खास आणि चव एक मधूर असते. याच कारणाने पहिल्या नजरेतच या आंबा लोकांना आकर्षित करतो.मोठ्या शहरांसह परदेशात या आंब्यांना मागणी वाढत चालली आहे.

### ९ झाडांसाठी ९ गार्ड

नूरजहाँ आंब्याची सर्वात खास बाब म्हणजे याची दुर्लभता आहे. झाडांवर मर्यादितच फळ लागते. यासाठी प्रत्येक फळ महत्वाचे आणि किमती असते. चोरी आणि नुकसान होऊ नये म्हणून शेतकरी फार्म हाऊसवर खास गार्ड तैनात करतात. या फार्म हाऊसवर देखील नऊ झाडांसाठी नऊ गार्डस् तैनात केले आहेत. एवढी सुरक्षा एखाद्या फॅक्टरी किंवा बंगला किंवा उद्योग धंद्यांना दिली जाते. मात्र, येथे आंब्यांच्या झाडाला व्हीव्हीआयपी सुरक्षा देण्यात आली आहे.

### सातासमुद्रापार नूरजहाँ आंबा जातो

नूरजहाँ आंब्यांना खास करून आखाती देशात मागणी वाढत आहे. संयुक्त अरब अमिरात (यूएई), सौदी अरब, कतार आणि कुवेतसारख्या आखाती देशात भारतीय प्रीमियम आंब्यांना मागणी वाढत आहे. याशिवाय अमेरिका, कॅनडा, युके येथील भारतीय लोक देखील अशा आंब्यांना खास पसंद करतात. सिंगापूर, मलेशिया आणि दक्षिण पूर्व आशियाई देशात यांना वेगळीच डिमांड आहे. या आंब्याचे निर्मिती कमी होत असल्याने जास्त निर्यात करता येत नाही.

### मुघल काळापासूनचा इतिहास

आंब्याची ही नूरजहाँ प्रजात अफगाणिस्तानातून भारतात आली, नंतर ती गुजरातमार्गे माळवा आणि झाबुआ-अलीराजपूर प्रदेशात पोहोचली. मुघल काळात, राजघराण्यांच्या बागांमध्ये मोठ्या आकाराच्या आणि वैशिष्ट्यपूर्ण चवीच्या आंब्यांना खूप महत्त्व होते.

### आंब्यांचे 'संग्रहालय'

इथे नूरजहाँ आंबा हा 'राजा' असला तरी, हा फार्म म्हणजे आंब्यांचा खजिना आहे. येथे हापूस, लंगडा, केसर, जंबो केसर, बाटली, पायरी, मालगोबा, रॉस, मकरम, बनाना मँगो, गुलाब-ए-खास आणि चंदेरी यांसारख्या डझनभर प्रसिद्ध जातींची लागवड केली जाते. शाही बारामसी आणि राणीराज यांसारख्या दुर्मिळ जातीही येथील प्रमुख आकर्षण आहेत.

।। सहकारातून समृद्धीकडे ।।
कै. हरी आण्णा निंबाजी पाटील
कै.खुशाल यादव पाटील
अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघ ली.
पंचवार्षिक निवडणूक 2025-30
वि.का.सोसायटी मतदारसंघातील सहकार पॅनलचे अधिकृत उमेदवार...
अ.क्र. १ — उमेदवाराचे नांव: भामरे गणेश धर्मराज — पोलीस पाटील, बाम्हणे, ता.अमळनेर; चेअरमन, बाम्हणे विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि. — निशाणी
अ.क्र. ५ — उमेदवाराचे नांव: पाटील नितीन बापूराव — संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, अमळनेर; लोकनियुक्त सरपंच, गडखांब, ता.अमळनेर — निशाणी
अ.क्र. ६ — उमेदवाराचे नांव: पाटील पंकज शांताराम — लोकनियुक्त सरपंच, निमझरी, ता.अमळनेर; चेअरमन, निमझरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि. — निशाणी
अ.क्र. ७ — उमेदवाराचे नांव: पाटील सचिन बाळू — संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, अमळनेर; लोकनियुक्त सरपंच, अंतुर्ली-रंजाणे, ता.अमळनेर — निशाणी
अ.क्र. ८ — उमेदवाराचे नांव: पाटील संजय त्र्यंबक — संचालक, विविध कार्यकारी सहकारी सोसायटी चौबारी; कार्यवाहक, ग्रंथालय संघ, जळगाव — निशाणी
सोसायटी मतदारसंघात आपणास पाच मत देण्याच्या अधिकार आहे.
मतदान - शनिवार 30 मे 2026 स. 8.00 ते सायं. 04.00 पर्यंत
ठिकाण : साने गुरुजी शाळा अमळनेर
तरी..." कपबशी " चिन्हासमोरील बटन दाबुन प्रचंड बहुमतांनी विजयी करावे... ही नम्र विनंती...!
प्रकाशक : भागवत पाटील ता.अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, अमळनेर; अशोक पाटील सभापती, कृ.उ.बा.समिती, अमळनेर; प्रा.सुरेश पाटील विधानसभा क्षेत्रप्रमुख, राष्ट्रवादी काँग्रेस,अमळनेर; सुनिल पवार मा.अध्यक्ष, आत्मा कमिटी, अमळनेर
मुद्रक : वर्धमान, प्रति : 1000

अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघ ली.
पंचवार्षिक निवडणूक 2025-30
व्यक्तिशा: मतदारसंघातील सहकार पॅनलचे अधिकृत उमेदवार...
कै. हरी आण्णा निंबाजी पाटील
कै.खुशाल यादव पाटील
सहकार पॅनल
अ.क्र. १ — उमेदवाराचे नांव: बागूल दिपक जगतराव — माजी व्हा. प्रेसिडेंट, शेतकरी सहकारी संघ, अमळनेर (मंगरुळ) — निशाणी
अ.क्र. ६ — उमेदवाराचे नांव: पाटील चंद्रकांत वसंत — माजी सरपंच, ग्रा.प. पिंगळवाडे (चकाअप्पा)(पिंगळवाडे) — निशाणी
अ.क्र. १० — उमेदवाराचे नांव: पाटील संभाजी लोटन — मा.संचालक, कृ.उ. बाजार समिती, अमळनेर (लोण) — निशाणी
अ.क्र. १२ — उमेदवाराचे नांव: पाटील संजय पुनाजी — मा. प्रेसिडेंट, शेतकरी सहकारी संघ, अमळनेर (पिंपळे) — निशाणी
अ.क्र. १७ — उमेदवाराचे नांव: शिसोदे अनिल शिवदास — मा. प्रेसिडेंट, शेतकरी सहकारी संघ, अमळनेर (प्र.डांगरी) — निशाणी
महिला मतदारसंघ
अ.क्र. १ — उमेदवाराचे नांव: देसले सुषमा वासुदेव — संचालिका, कृ.उ. बाजार समिती, अमळनेर (दहिवद) — निशाणी
अ.क्र. २ — उमेदवाराचे नांव: पाटील मालुबाई बापुराव — गुणवंत पाटील यांच्या मातोश्री (झाडी) — निशाणी
ओ.बी.सी. मतदारसंघ
अ.क्र. २ — उमेदवाराचे नांव: पाटील विक्रांत भास्कर — सेक्रेटरी, अमळनेर तालुका मराठा समाज (अमळनेर) — निशाणी
एस.सी./एस.टी मतदारसंघ
अ.क्र. १ — उमेदवाराचे नांव: बैसाणे शंकर बंडू (बैसाणे सर) — निवृत्त मुख्याध्यापक, प्रताप हायस्कूल, अमळनेर (देवळी) — निशाणी
एन.टी. मतदारसंघ
अ.क्र. ३ — उमेदवाराचे नांव: पाटील रणजित भिमसिंग — माजी शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, अमळनेर (अमळनेर) — निशाणी
सन्माननीय मतदार बंधू-भगिनींना नम्र विनंती की, आम्ही अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघ लि. अमळनेर पंचवार्षिक निवडणुक 2025-30 च्या निवडणुकीत सदस्य पदासाठी सहकार पॅनल तर्फे निवडणूक लढवीत आहोत... तरी आपले बहुमोल मत सहकार पॅनलच्या सर्व उमेदवारांच्या " कपबशी " या चिन्हाला फुलीचा शिक्का मारुन प्रचंड मतांनी विजयी करा ही नम्र विनंती.
शनिवार, 30 मे 2026 स. 8.00 ते सायं. 4.00 पर्यंत | ठिकाण : साने गुरुजी शाळा अमळनेर
प्रकाशक : भागवत पाटील ता.अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, अमळनेर अशोक पाटील सभापती, कृ.उ.बा.समिती, अमळनेर प्रा.सुरेश पाटील विधानसभा क्षेत्रप्रमुख, राष्ट्रवादी काँग्रेस,अमळनेर सुनिल पवार मा.अध्यक्ष, आत्मा कमिटी, अमळनेर
मुद्रक : वर्धमान, प्रति : 1000





# श्री मंगळग्रह देवांचे जन्मस्थान उज्जैन की अमळनेर?

## पौराणिक आणि लोकश्रद्धेप्रमाणे नेमके काय खरे आहे?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

पृथ्वी अर्थात भूमीमाता पुत्र श्री मंगळग्रह देव कोठे जन्माला आले? मध्य प्रदेशातील उज्जैनमधील मंगळनाथ नावाच्या ठिकाणी अथवा महाराष्ट्रातील जळगावजवळील अमळनेर येथे श्री मंगळग्रह देवांचे प्राचीन व पवित्र स्थान कोठे आहे? पौराणिक आणि लोकश्रद्धेप्रमाणे काय खरे? श्री मंगळ देवांचा जन्म कुठे झाला? अमळनेर की उज्जैन?





### श्री मंगळ देवांचा परिचय

पुराणात श्री मंगळ देवांना भूमीपुत्र मानले गेले आहे. भूमीदेवी या वराह देवाची पत्नी असल्याचे मानले जाते. श्री मंगळ देव हे भगवान शिव यांचा अंश मानले जातात. अनेक ठिकाणी श्री मंगळ देवांना ब्रह्मचारी मानले गेले आहे, तर काही ठिकाणी त्यांची पत्नी ज्वालिनी देवी मानली गेली आहे. श्री मंगळ देव यांचे वाहन मेंढा असून त्यांनी हातात त्रिशूल, गदा, पद्म आणि भाला किंवा शूल धारण केले आहे. श्री मंगळ देव देवांचे सेनापती आहेत.

### श्री मंगळग्रह आणि देवता

श्री मंगळ देव हे श्री मंगळग्रह आणि युद्धाची देवता आहेत. श्री मंगळ देवांचा रंग लाल आहे. त्याचप्रमाणे श्री मंगळग्रहाचा रंग देखील लाल असल्याने त्यांना 'अंगारक' असे देखील म्हणतात. श्री मंगळ देवांची प्रकृती तामस गुणाची आहे.
मंगळ धैर्य, आत्मविश्वास आणि गर्विष्ठपणाचे प्रतिनिधित्व करते. श्री मंगळग्रह किंवा श्री मंगळ देवांचा जन्मवार मंगळवार आहे. मंगळ हा मेष आणि वृश्चिक या राशींचा स्वामी आहे. मंगळ दहाव्या घरात म्हणजेच मकर राशीत उच्चस्थानी आहे आणि सिंह राशीत दुर्बल आहे.

### मंगळाच्या उत्पत्तीची कथा

**१) पहिली कथा :** मंगळाच्या उत्पत्तीचे पौराणिक वर्णन स्कंदपुराणातील अवंतिका विभागात आढळते. एकेकाळी उज्जयिनी पुरीत अंधक नावाचा राक्षस राज्य करत असे. त्याच्या पराक्रमी मुलाचे नाव कनक राक्षस होते. एकदा त्या पराक्रमी वीराने इंद्राला युद्धासाठी आव्हान दिले. तेव्हा इंद्राने रागाने त्याच्याशी युद्ध करून त्याचा वध केला. त्या राक्षसाचा वध केल्यानंतर ते अंधकासुराच्या भीतीने भगवान शंकर यांच्या शोधात कैलास पर्वतावर गेले. इंद्राने भगवान चंद्रशेखर यांची भेट घेऊन त्यांची अवस्था सांगितली आणि रक्षणासाठी प्रार्थना केली, हे देवा! मला अंधकासुरापासून संरक्षण दे. इंद्राचे शब्द ऐकून वत्सल शिव यांनी इंद्राला शरणागती पत्करली आणि अंधकासुराला युद्धाचे आव्हान दिले. युद्ध भयंकर झाले आणि लढत असताना भगवान शंकर यांच्या कपाळावरून अंगारासारखा लाल झालेला घामाचा एक थेंब पृथ्वीवर पडला. त्याने अंगारासमान लाल रंगाच्या भूमीपुत्र श्री मंगळ देव यांचा जन्म झाला. अंगारक, रक्ताक्ष आणि महादेवपुत्र या नावांनी स्तुती करून ब्राह्मणांनी त्यांना ग्रहांमध्ये प्रतिष्ठित केले. त्यानंतर ब्रह्माजींनी त्याच ठिकाणी मंगळेश्वर नावाच्या परिपूर्ण शिवलिंगाची स्थापना केली. सध्या हे ठिकाण उज्जैनमध्ये असलेले मंगलनाथ मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे.

मत्स्य पुराणात लिहिले आहे, की **'अवन्त्यांच कुजोजातों मगधेच हिमाशुनः'। तथा संकल्प में अवन्तिनदेशोतभव भो भोम'**

**२) दुसरी कथा :** ब्रह्म वैवर्त पुराणानुसार वाराह कल्पमध्ये दैत्य राजा हिरण्यकशिपूचा भाऊ हिरण्यक्ष याने पृथ्वी चोरून समुद्रात नेली. भगवान विष्णू यांनी वराह अवतार घेऊन हिरण्यक्षाचा वध करून पृथ्वीला पाताळातून काढून परात्पर पिता ब्रह्मदेवाने ज्या महासागरावर जग निर्माण केले त्या समुद्रावर त्याची स्थापना केली. पृथ्वी सकाम रूपात आली आणि वराह रूपात असलेल्या श्री हरींची पूजा करू लागली. पृथ्वीचे सुंदर आकर्षक रूप पाहून वासनेच्या प्रभावाखाली श्रीहरींनी पृथ्वीशी एक दिव्य वर्षापर्यंत रती क्रीडा केली. या योगायोगामुळे पृथ्वीच्या उदरातून एका महान बालकाचा जन्म झाला ज्याला 'श्री मंगळ देव' या नावाने ओळखले जाते. देवी भागवतातही या कथेचे वर्णन आहे. या दंतकथेनुसार त्यांचा जन्म कुठे झाला हे माहीत नाही.

### श्री मंगळग्रह देवतेचे जन्मस्थान

**श्री मंगळनाथ मंदिर, उज्जैन :** मत्स्य पुराणात श्री मंगळग्रह देवतेला भूमिपुत्र म्हटले आहे. पौराणिक मान्यतेनुसार उज्जैनला श्री मंगळदेव ग्रहांची जन्मभूमी मानले गेले आहे. मात्र, तेथे श्री मंगळदेव ग्रहांची मूर्ती नाही. तेथे शिवलिंगावरच मंगळशांतीचे सर्व धार्मिक सोपस्कार होतात. उज्जैन येथील शिवलिंगालाच 'मंगलनाथ' असेही म्हणतात. श्री मंगळदेव ग्रहांची शांती, शिव कृपा, ऋणमुक्ती आणि धन प्राप्ती हेतु श्री मंगलनाथजींची उपासना केली जाते.

**अमळनेरचे श्री मंगळदेव ग्रह मंदिर :** अमळनेर येथील श्री मंगळग्रह देवतेचे स्थान प्राचीन आणि जागृत स्थळ असल्याचे मानले जाते. येथे मांगलिक दोषापासून मुक्ती, रोगमुक्ती, भयमुक्ती आणि जीवनात यश मिळविण्यासाठी दर मंगळवारी लाखो भाविक अभिषेक करण्यासाठी येतात. येथे असलेल्या मंदिराचा १९३३ मध्ये पहिल्यांदा जीर्णोद्धार करण्यात आल्याचे मानले जाते. जाणकारांच्या मते संपूर्ण भारतात स्वतंत्रपणे श्री मंगळदेव ग्रहाची मंदिरे अत्यंत दुर्मिळ आहेत. १९९९ ला या मंदिराचा पुनर्जीर्णोद्धार करण्यात आला. आता ते तीर्थक्षेत्र म्हणून विकसित केले गेले आहे. अमळनेर येथे श्री मंगळग्रह देवतेची मूर्ती पुराणात नमूद केल्याप्रमाणे विराजमान आहे. येथे श्री मंगळदेव ग्रहांची विश्वातील एकमेव मूर्ती पौराणिक स्वरूपात विराजमान आहे. येथे श्री मंगळग्रह देवतेच्या मातोश्री अर्थात भूमीमातेची विश्वातील एकमात्र दाक्षिणात्य शैलीतील काळ्या पाषाणातील मूर्ती श्री मंगळग्रह देवतेच्या शेजारीच स्थापित आहे. तर श्री मंगळग्रह देवतेच्या मूर्तीच्या दुसऱ्या बाजूला त्यांचे गुरू अर्थात पंचमुखी हनुमानजींची दाक्षिणात्य शैलीतील काळ्या पाषाणातील मूर्ती स्थापित आहे. जगातील पहिले भूमीमाता मंदिर येथे असल्याचे मानले जाते. मंगळ शांतीसाठी अमळनेर येथील श्री मंगळग्रह मंदिरात दररोज अभिषेक व होम-हवन केले जातात. येथे भाविकांच्या निवासाची अतिशय उत्तम व्यवस्था देखील आहे. येथे दर मंगळवारी श्री मंगळग्रह देवतेची पालखी मिरवणूक काढली जाते. तसेच महाआरती केली जाते. या दिवशी मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे महाप्रसादाची व्यवस्थाही केली जाते. महाप्रसादात दर्जेदार आहार दिला जातो. ज्यात पंचरत्न डाळ, बासमती तांदूळपासून बनविलेला जिराभात, शुद्ध गावरान तुपातील बट्टी, रश्श्याची मटकीची उसळ व शुद्ध गावरान तुपात तळलेली गुळाची जिलेबी असा महाप्रसाद अवघ्या ६३ रुपयांत भाविकांना दिला जातो.

### कसे पोहोचाल श्री मंगळग्रह मंदिर, अमळनेर

– पुणे आणि मुंबईहून अमळनेर अंतर : अमळनेर हे पुण्यापासून ४५१ किलोमीटर अंतरावर आहे. हे ठिकाण मुंबईपासून ४९२ किलोमीटर अंतरावर आहे. येथे पोहोचण्यासाठी रेल्वे आणि बस या दोन्हीही सेवा उपलब्ध आहेत.

– जळगाव ते अमळनेर अंतर : येथे जाण्यासाठी महाराष्ट्रातील जळगाव येथे पोहोचू शकता. अमळनेर हे जळगाव जिल्ह्यातील एक प्रमुख गाव आहे. जळगावपासून अमळनेर ५५ ते ६५ किलोमीटर अंतरावर आहे. जळगावहून रेल्वे, बस किंवा खासगी वाहनाने येथे पोहोचता येते.

– धुळे ते अमळनेर अंतर : धुळे शहरापासून बस, टॅक्सी अथवा खासगी वाहनाद्वारे येथे पोहोचू शकता. धुळे येथून अमळनेर ३६ किलोमीटर अंतरावर आहे.

– अमळनेर ते श्री मंगळग्रह मंदिर अंतर : अमळनेर बसस्थानक अथवा रेल्वेस्थानकापासून श्री मंगळग्रह मंदिर २.५ किलोमीटर अंतरावर आहे. मंदिरापर्यंत पोहोचण्यासाठी अनेक ऑटो रिक्षा उपलब्ध आहेत.



# वास्तु देव की उत्पत्ति की कथा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

प्राचीन काल में भगवान शिव और अंधकासुर के बीच एक अत्यंत भयंकर युद्ध हुआ था। अंधकासुर को यह वरदान प्राप्त था कि उसकी रक्त की बूंदें जहाँ भी गिरेंगी, वहाँ से नए अंधकासुर उत्पन्न हो जाएंगे। इस भीषण युद्ध के दौरान भगवान शिव के मस्तक से पसीने की एक बूंद धरती पर गिरी।

उस पसीने की बूंद से एक विशाल और भयंकर मुख वाला प्राणी उत्पन्न हुआ। वह इतना बड़ा था कि ऐसा प्रतीत हो रहा था मानो वह पूरी पृथ्वी को ही निगल जाएगा। भगवान शिव की प्रेरणा से उस प्राणी ने धरती पर गिरे अंधकासुर के सारे रक्त को पी लिया, जिससे अंधकासुर का पूरी तरह से नाश हो गया।

### त्रिलोक को निगलने का प्रयास और देवताओं का निवास

अंधकासुर का रक्त पीने के बाद भी उस भयानक प्राणी की भूख शांत नहीं हुई। भूख और क्रोध में आकर उसने पूरे त्रिलोक को निगलने का प्रयास किया। यह देखकर भगवान शिव ने उसे रोका और धरती पर पटक दिया। वह प्राणी दोबारा उठकर संसार का विनाश न कर सके, इसके लिए भगवान शिव की आज्ञा से ४५ देवी-देवता उसके शरीर पर आकर बैठ गए और उसे भूमि पर दबा दिया।

जब उसे पृथ्वी पर गिराया गया था, तब उसका मुख ईशान कोण में, बायाँ हाथ वायव्य कोण में, दायाँ हाथ आग्नेय कोण में और दोनों पैर नैऋत्य कोण में थे। देवताओं के भारी वजन के कारण वह उठ नहीं पा रहा था।

### ब्रह्मा जी का वरदान

उस पुरुष ने अपनी इस दयनीय स्थिति को देखकर देवताओं से अत्यंत विनम्रतापूर्वक प्रार्थना की कि यदि आप सब मुझे इस तरह दबाकर रखेंगे, तो मैं कैसे जीवित रहूँगा? उसकी इस विनम्रता से प्रसन्न होकर परमपिता ब्रह्मा जी ने उसे अपना मानस पुत्र स्वीकार किया और उसे 'वास्तु' नाम दिया। ब्रह्मा जी ने उसे वरदान देते हुए कहा कि वैश्वदेव यज्ञ के अंत में जो भी बलि (भोजन) दी जाएगी, वह उसका आहार बनेगी। घर के निर्माण या वास्तु शांति के समय यज्ञ में जो सामग्री अर्पित की जाएगी, वह उसे प्राप्त होगी। जो व्यक्ति अपने घर के निर्माण के समय तुम्हारी (वास्तु देव की) पूजा नहीं करेगा, उसे तुम अपने आहार के रूप में ग्रहण कर सकोगे। इस प्रकार वरदान प्राप्त करने के बाद वास्तु पुरुष हमेशा के लिए उसी अवस्था में भूमि पर स्थित हो गए।

४५ देवताओं की स्थिति और महत्व

वास्तु पुरुष के शरीर को दबाकर रखने वाले ४५ देवताओं में से ३२ देवता उनके शरीर के बाहरी हिस्से में और १३ देवता शरीर के आंतरिक हिस्से में निवास करते हैं। इसी कारण से जब भी किसी नए घर या भवन का निर्माण कार्य शुरू होता है, तो सबसे पहले वास्तु पुरुष की पूजा की जाती है। वास्तु देव की पूजा करने से उनके शरीर पर निवास करने वाले सभी ४५ देवी-देवताओं की पूजा अपने आप हो जाती है और घर में सुख-समृद्धि का वास होता है।

**राधे राधे**

# अधिकमास काढण्याची पद्धत

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



**अ) सामान्य नियम**

ज्या मासाच्या कृष्ण पंचमीस सूर्याची संक्रांत येईल, तोच मास प्रायः पुढील वर्षी अधिकमास होतो; परंतु हे स्थूलमान (सर्वसाधारण) आहे.

**आ) शालिवाहन शक पद्धती**

शालिवाहन शकास १२ ने गुणावे आणि त्या गुणाकारास १९ ने भागावे.

जी बाकी राहील, ती ९ किंवा त्यापेक्षा न्यून असेल, तर त्या वर्षी अधिक मास येईल, असे समजावे.

**इ) विक्रम संवत पद्धती (अधिक विश्वसनीय)**

विक्रम संवत् संख्येत २४ मिळवून त्या बेरजेला १६० ने भागावे.

**बाकी अधिक मास**

३०, ४९, ६८, ८७, १०६, १२५ – चैत्र,

११, ७६, ९५, ११४, १३३, १५२ – वैशाख,

०, ८, १९, २७, ३८, ४६, ५७, ६५, ८४, १०३, १२२, १४१, १४९– ज्येष्ठ,

१६, ३५, ५४, ७३, ९२, १११, १३०, १५७ – आषाढ,

५, २३, ४६, ६२, ७०, ८१, ८२, ८९, १००, १०८, ११९, १२७, १३८, १४६ – श्रावण,

१३, ३२, ५१ – भाद्रपद,

२, २१, ४०, ५९, ७८, ९७, १३५, १४३, १४५ – आश्विन.

अन्य संख्या बाकी उरल्यास अधिक मास येत नाही.

# गणपती बाप्पांच्या सासऱ्याचे नाव काय?

## विघ्नहर्त्यांच्या सासरवाडीबद्दल जाणून घ्या

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

गणपती बाप्पा सामान्यतः ब्रह्मचारी मानले जातात. पण रिद्धी आणि सिद्धी या त्यांच्या दोन पत्नींचा उल्लेख धर्मग्रंथांत आहे. रिद्धी आणि सिद्धीच्या विवाहानंतर त्यांना शुभ आणि लाभ हे दोन पुत्र झाले. या कुटुंबाची पूजा करणे शुभ मानले जाते. कारण ती सुख, समृद्धी आणि यश आणते.

गणपती बाप्पांच्या आगमनाने राज्यात सर्वत्र उत्साह संचारलेला पाहावयास मिळतो. आपण सर्वांचे लाडके विघ्नहर्ता आणि बुद्धीची देवता श्रीगणेशांच्या अद्भुत कथांचा अनुभव विशेषतः गणेशोत्सवकाळात घेतो. हिंदू धर्मात गणपती बाप्पांना प्रथम पूजनीय मानले जाते आणि त्यांच्याविषयी अनेक धार्मिक मान्यता प्रचलित आहेत.



सामान्यतः गणपती बाप्पांना ब्रह्मचारी मानले जाते; परंतु अनेक धर्मग्रंथांमध्ये त्यांच्या दोन पत्नींचा उल्लेख आढळतो. रिद्धी आणि सिद्धी अशी त्यांच्या पत्नींची नावे आहेत. या दोन देवतांची गणपती बाप्पांसोबत पूजा करणे अतिशय शुभ मानले जाते.

एका मान्यतेनुसार रिद्धी आणि सिद्धी या भगवान विश्वकर्मा यांच्या कन्या होत्या. विश्वकर्मा हे देवांचे वास्तुशास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात. या मान्यतेनुसार विश्वकर्मा हे गणपती बाप्पांचे सासरे आहेत. तर दुसऱ्या एका मान्यतेनुसार रिद्धी आणि सिद्धी या ब्रह्मदेवाच्या मानस कन्या होत्या. याचा अर्थ असा, की त्यांची निर्मिती ब्रह्मदेवाच्या संकल्पनेतून झाली होती. या मान्यतेनुसार ब्रह्मदेव हे गणपती बाप्पांचे सासरे आहेत.

रिद्धी आणि सिद्धी यांच्यासोबतच्या विवाहानंतर गणपती बाप्पांना दोन पुत्र झाले. रिद्धीचा पुत्र शुभ आणि सिद्धीचा पुत्र लाभ. अनेक कुटुंबांमध्ये गणपती बाप्पांच्या प्रतिमेसोबत रिद्धी-सिद्धी आणि त्यांचे पुत्र शुभ-लाभ यांच्या मूर्ती किंवा चित्रे लावण्याची प्रथा आहे. या संपूर्ण कुटुंबाची पूजा केल्याने घरात सुख, समृद्धी, बुद्धिमत्ता आणि यश मिळत असते.

# हनुमानजींच्या जन्माची 'ही' रहस्ये माहिती आहेत का?



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

हनुमानजींचा जन्म चैत्र शुद्ध पौर्णिमेला अंजनी मातेच्या पोटी झाला. त्यामुळे चैत्र शुद्ध पौर्णिमा हनुमान जयंती म्हणून साजरी केली जाते. मात्र, हनुमानजींच्या जन्माविषयी काही रहस्ये सांगितली जातात. हनुमानजींच्या जन्माविषयी विविध मान्यता आहेत, जाणून घेऊया.

मनोजवं मारुततुल्यवेगं
जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं
श्रीरामदूतम् शरणं प्रपद्ये।।

शक्ती आणि बुद्धीचा सर्वोत्तम संगम असलेल्या हनुमानजींना मारुती, बजरंगबली, रामभक्त, आंजनेय, महावीर, पवनपुत्र, पवनसुत, केसरीनंदन अशा अनेक नावांनी संबोधले जाते. हनुमानजींचे शस्त्र गदा आहे. हनुमानजींना मारुती म्हणण्याची पद्धत केवळ महाराष्ट्रातच आढळून येते. हनुमानजींना तेल, शेंदूर, रुईची फुले, पाने अर्पण करण्याची परंपरा आहे. हनुमानजींना महादेव शिवशंकरांचा अवतारही मानले जाते. दशरथाच्या राण्यांप्रमाणेच तपश्चर्या करणाऱ्या अंजनीलाही पायस मिळाले होते व त्यामुळेच मारुतीरायांचा जन्म झाला होता.

### हनुमानजींच्या जन्माविषयी विविध मान्यता

रामभक्त हनुमानजींच्या जन्मस्थळाविषयी नेमकी स्पष्टता नाही. संपूर्ण भारतात हनुमानजींच्या जन्मतिथीबद्दल अनेक मतमतांतरे आहेत. उत्तर भारतात आणि दक्षिण भारतात हनुमान जयंती वेगवेगळ्या तारखेला साजरी केली जाते. तमिळनाडू आणि केरळात मार्गशीर्षात, तर ओडिसामध्ये वैशाख महिन्याचा पहिल्या दिवशी साजरी केली जाते. वाल्मिकी ऋषींच्या रामायणानुसार हनुमानजींचा जन्म कार्तिक महिन्यातील कृष्ण पक्षाच्या चतुर्दशीला मंगळवारी झाला. चैत्र महिन्यातील तिथी विजय महोत्सव आणि कार्तिक महिन्यातील तिथी वाढदिवसाच्या रूपात साजरी केली जाते, असे म्हटले जाते.

### चिरंजीव हनुमान

एका मान्यतेनुसार हनुमानजींची भक्ती आणि समर्पण वृत्ती पाहून सीता मातेने त्यांना अमरत्वाचे वरदान दिले. हा दिवस नरक चतुर्दशीचा होय. सूर्याला गिळंकृत करण्यासाठी गेलेले हनुमानजी इंद्राच्या वज्रामुळे जखमी झाले. या घटनेमुळे वायुदेव क्रोधीत झाले. अखेर सर्व देवतांनी हनुमंतजींना अस्त्रे, शस्त्रे आणि चिरंजीवत्वाचे वरदान दिले, असेही म्हटले जाते. हनुमानजींच्या व्रात्यपणामुळे एक ऋषींनी हनुमानजींना शक्तीच्या विस्मृतीचा शाप दिला होता. सीताशोधार्थ समुद्र ओलांडून जाण्यापूर्वी जाम्बुवंतांनी हनुमानजींना त्यांच्या शक्तीची आठवण करून दिली. मात्र, यादरम्यान हनुमंतजींनी बुद्धीची अनेक कामे केल्याचे सांगितले जाते.

### ब्राह्मतेज व क्षात्रतेजाचे प्रतीक

हनुमानजींच्या गळ्यातील जानवे हे ब्राह्मतेजाचे प्रतीक असून, हनुमंतजी हे महादेवाचे अवतार असल्याने त्यात लय करण्याचे सामर्थ्य आहे. रामभक्ती करताना त्यांच्यात विष्णुतत्त्व आल्यामुळे त्यात स्थितीचेही सामर्थ्यही आले. हनुमानजींमध्ये ब्राह्मतेज व क्षात्रतेज दोन्ही असल्याने युद्धावेळी आवश्यकतेनुसार ते त्यांचा वापर करत असत, असे सांगितले जाते. महाभारत युद्धात श्रीकृष्णांनी हनुमानजींना अर्जुनाच्या रथावर स्थान दिले. तेव्हा हनुमानजींनी रथ व अर्जुन यांच्यावर येणारी अस्त्रे व शस्त्रे हवेतच नष्ट केली होती.

### बुद्धी व शक्तीचा संगम

हनुमानजी शक्ती, सामर्थ्यासाठी जेवढे प्रसिद्ध आहेत, तेवढेच बुद्धीसाठीही ते प्रसिद्ध आहेत. लहानपणी हनुमानजींनी गुरुकुलात जाऊन अनेक विद्या आत्मसात केल्या. वानरांची युद्ध करण्याची विशिष्ट पद्धतीही त्याने शिकून घेतली. वेद, उपनिषदे त्याने लहानपणीच तोंडपाठ केली होती. हनुमानजींना अनेक भाषा येत होत्या. म्हणूनच प्रभू श्रीराम-लक्ष्मण यांची खबर काढण्यासाठी सुग्रीवाने हनुमानजींना पाठविले होते. तसेच सीता मातेचा शोध घेण्यासाठी हनुमजींना पाठविण्यात आले होते. तसेच समुद्र लांघणे, समुद्र सेतू उभारणे, राक्षसांचा नाश, लक्ष्मणासाठी संजीवनी आणणे यातून हनुमानजींच्या शक्तीची प्रचिती येते. जन्मतःच मारुतीरायांनी सूर्याला गिळण्यासाठी उड्डाण केले अशी जी कथा आहे त्यातून वायूपुत्र मारुतीराय तेजतत्त्वाला जिंकणारे होते, हे लक्षात येते.

### हनुमानजींविषयी अन्य महत्त्वाच्या गोष्टी

हनुमानजी चिरंजीवी असल्याने ते आजदेखील अस्तित्वात असल्याची मान्यता भाविकांमधे आहे. हनुमानजींना लावण्यात येणारा शेंदूर अत्यंत पवित्र मानला जातो. शरीरसौष्ठव कमावण्याची आवड असणाऱ्यांनी हनुमानजींची आराधना करावी, असे मानले जाते. हनुमान स्तोत्र व हनुमान चालिसा म्हणणाऱ्यांना आत्मिक समाधानाची प्राप्ती होते, असे म्हटले जाते. साडेसाती सुरू असलेल्या व्यक्तींनी दररोज किंवा किमान प्रत्येक मंगळवारी व शनिवारी मारुतीरायांचे दर्शन घ्यावे, असे सांगितले जाते. हनुमानजींना शक्ती, स्फूर्ती आणि उर्जेचे प्रतीक मानण्यात आले आहे.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)